महाराष्ट्र शासन
वन विभाग

# वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त, नागपूर यांचे कार्यालय

(नविन प्रशासकीय इमारत (वनभवन),झिरो माईल, नागपूर 440 001)
(Land Line No - 0712-2564569, Email-id : ccftnagpur@mahaforest.gov.in)

**क्र.कक्ष-1/आस्था-अ/ विधी सल्लागार/प्रक्र.385/25-26/**2573 **दिनांक ऑक्टोंबर, 2025**

**ई-मेलव्दारे**

**प्रति,**
सहायक संचालक (जाहिरात),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
राजगुरु हुतात्मा चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालया समोर, मुंबई

**विषय** :- **जाहीरात प्रसिध्द करणे बाबत.**
नागपूर वनवृत्तांतर्गत शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी " विधी सल्लागार " पदावर घेणे बाबत.

सोबत जोडलेली जाहिरात लोकमत स्थानीक वृत्तपत्रात दि.30.10.2025 रोजी प्रसिध्द करण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | मुळ कार्यालयाचे नाव | : | वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त नागपूर |
| 2. | प्रसिध्दी दिनांक शेवटचा किंवा त्यापुर्वीचा दिनांक | : | 30.10.2025 |
| 3. | देयकाचे भुगतान करणाऱ्या कार्यालयाचे नाव | : | वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त नागपूर, नविन प्रशासकीय इमारत (वनभवन), झिरो माईल, नागपूर 440001 |
| 4. | प्रसिध्दी करिता वर्तमान पत्राची संख्या | : | दोन |
| 5. | प्रसिध्दी करीता देणाऱ्या मसुद्याची संख्या | : | एकाच ठिकाणी एक वेळा |

सोबत जाहिरातीचा मसुदा आपणाकडे पाठविण्यात येत आहे.

**सहपत्र** :- वरीलप्रमाणे

**(श्रीलक्ष्मी.ए)**
वनसंरक्षक (प्रादे.) नागपूर
वनवृत्त, नागपूर

**प्रतिलीपी** : उपवनसंरक्षक नागपूर,वर्धा,भंडारा व गोंदिया यांना सहपत्रासह माहिती व पुढील कार्यवाहीस अग्रेषीत. त्यांनी उक्त जाहिरातीची प्रत त्यांचे कार्यालयाचे सुचना फलकावर लावावी.

**प्रतिलीपी** : श्री.योगेश काळे, NIC प्रोग्रामर, नागपूर यांनी सदरहु जाहिरात दि.30.10.2025 रोजी वनविभागाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणे बाबत पुढील कार्यवाही करावी.

महाराष्ट्र शासन

## वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचे कार्यालय

### जाहिरात

**नागपूर वनवृत्तांतर्गत शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी "विधी सल्लागार" पदावर घेणेबाबत.**

नागपूर प्रादेशिक वनवृत्तांर्गत नागपूर, वर्धा, भंडारा व गोंदिया या वनविभागातील व सामाजिक वनीकरण विभागातील तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)-पुर्व, नागपूर व त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व वन्यजीव विभागातील आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा., नागपूर कार्यालयातील जमिन विषयक, वनगुन्हे व आस्थापना विषयक तसेच इतर न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणांचा तातडीने पाठपुरावा करुन निपटारा करण्यासाठी एमपॅनलमेंट (Empanelment) करुन सेवा करार पध्दतीने "विधी सल्लागाराची" नेमणूक करावयाची आहे. याकरीता शासन सेवेतून सेवानिवृत्त झालेले जिल्हा न्यायाधिश, सेवानिवृत्त अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश, सेवानिवृत्त प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी किंवा विधी व न्याय विभागामधुन सेवानिवृत्त झालेले सहसचिव/उपसचिव/अवर सचिव या दर्जाचे इच्छुक व पात्र सेवानिवृत्त अधिकारी यांचेकडून दि.17.12.2016 च्या शासन निर्णयाचे अधिन राहून अर्ज मागविण्यात येत असून सविस्तर जाहिरात www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

तरी, पात्र व इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांचे विहीत नमुन्यातील अर्ज दि.17/11/2025 पावेतो वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त, नागपूर, नवीन प्रशासकीय इमारत, शासकीय मुद्रणालयाजवळ, झिरो माईल, नागपूर-440 001 या पत्त्यावर सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहचतील या बेताने पोस्टाने/ई-मेलव्दारे आवश्यक दस्ताऐवजासह पाठवावे.

नागपूर.
दिनांक :

महाराष्ट्र शासन

# वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचे कार्यालय

(नवीन प्रशासकीय इमारत, शासकीय मुद्रणालयाजवळ, झिरो माईल, नागपूर-440 001,
दुरध्वनी क्रमांक 95-712-2564 569) E-mail id :-ccftnagpur@mahaforest.gov.in

जाहिरात दिनांक - 30 **ऑक्टोंबर,2025**

## नागपूर वनवृत्तांतर्गत शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत जाहिरात (विधी सल्लागार - 1 पद)

समान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13,दि.17.12.2016 व महसूल व वनविभाग, शासन पत्र क्रमांक एस-30/12/2012/प्र.क्र.233/फ-6, दि.26.11.2019 नुसार नागपूर प्रादेशिक वनवृत्तांर्गत नागपूर, वर्धा, भंडारा व गोंदिया या वनविभागातील व सामाजिक वनीकरण विभागातील तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)-पुर्व, नागपूर व त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व वन्यजीव विभागातील आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा., नागपूर कार्यालयातील जमिन विषयक, वनगुन्हे व आस्थापना विषयक तसेच इतर न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणांचा तातडीने पाठपुरावा करुन निपटारा करण्यासाठी एमपॅनलमेंट (Empanelment) करुन सेवा करार पध्दतीने विधी सल्लागाराची नेमणूक करावयाची आहे. याकरीता शासन सेवेतून सेवानिवृत्त झालेले जिल्हा न्यायाधिश, सेवानिवृत्त अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश, सेवानिवृत्त प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी किंवा विधी व न्याय विभागामधुन सेवानिवृत्त झालेले सहसचिव/उपसचिव/अवर सचिव या दर्जाचे इच्छुक व पात्र सेवानिवृत्त अधिकारी यांचेकडून दि.17.12.2016 च्या शासन निर्णयाचे अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहे.

वरिल कामाकरीता इच्छुक शासन सेवेतून सेवानिवृत्त झालेले जिल्हा न्यायाधिश, सेवानिवृत्त अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश, सेवानिवृत्त प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी किंवा विधी व न्याय विभागामधुन सेवानिवृत्त झालेले सहसचिव/उपसचिव/अवर सचिव या दर्जाचे अधिकारी यांना कामाचे आवश्यकतेनुसार सेवाकरार पध्दतीने प्रथमत: 1 वर्षाकरीता घेण्यात येईल व आवश्यकतेप्रमाणे सदर कालावधी करार वाढविण्यात येईल. मात्र असा एकूण कालावधी 3 वर्षापेक्षा जास्त असणार नाही. उक्त शासन निर्णयाची प्रत www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक 201612171718241307 असा आहे.

**सेवा करार पध्दतीने भरावयाची पदसंख्या**

| अ.क्र. | पदाचे नांव | संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| 1. | विधी सल्लागार | 1 | नागपूर प्रादेशिक वनवृत्तांर्गत नागपूर, वर्धा, भंडारा व गोंदिया या वनविभागातील व सामाजिक वनीकरण विभागातील तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)-पुर्व, नागपूर व त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व वन्यजीव विभागातील आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा., नागपूर कार्यालयातील जमिन विषयक, वनगुन्हे व आस्थापना विषयक तसेच इतर न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणांचा तातडीने पाठपुरावा करुन निपटारा करण्यासाठी. |

### 1) शैक्षणिक अर्हता व अनुभव :-

1. मान्यता प्राप्त विद्यापीठातून कायद्याचा पदवीधर व सनदधारक.
2. जिल्हा न्यायाधिश, सेवानिवृत्त अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश, सेवानिवृत्त प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी किंवा विधी व न्याय विभागामधुन सेवानिवृत्त झालेले सहसचिव/उपसचिव/अवर सचिव या दर्जाचे अधिकारी या शासन सेवेतून सेवानिवृत्त झालेले असावा.

3. करार पध्दतीने नियुक्ती करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक वा आरोग्याचे दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांचेकडे आवश्यक क्षमता असावी.
4. करार पध्दतीने नियुक्ती करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही साक्ष झालेली नसावी.
5. उमेदवार वन विषयक, फौजदारी व दिवाणी विषयक, सेवा व आस्थापना तसेच कामगार विषयक बाबीत ज्ञान संपन्न असावा.
6. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे.

**2) कर्तव्य व जबाबदारी** :-

1. संबंधित वनाधिकाऱ्याकडून विधी विषयक सल्ला देण्याबाबत लेखी स्वरुपात संदर्भ प्राप्त झाल्यावर त्यांना लेखी स्वरुपात सल्ला देणे.
2. वनगुन्हे प्रकरणी आरोपींना ताब्यात घेणेबाबत न्यायालयाकडून आवश्यक तो कालावधी वाढवून घेणे.
3. सरकारी वकील यांचेशी समन्वय साधून त्यांच्या अनुपस्थितीमध्ये इतर प्रकरणांमध्ये न्यायालयात शासनाचेवतीने म्हणने सादर करणे/बाजू मांडणे.
4. वनविभागाच्या जुन्या न्यायालयीन प्रकरणी आढावा व पाठपुरावा करणे. तसेच यासाठी आवश्यक ती सरकारी वकीलाची मदत घेणे.
5. वनविभागाच्यावतीने न्यायालयात प्रतिज्ञापत्र, परिच्छेद निहाय उत्तर तयार करणे व वनवृत्तांतर्गत कार्यरत कार्यालय प्रमुखांना कायदे विषयक सल्ला देणे. तसेच टंकलेखनाकरीता वेगळयाने मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.
6. वनविभागाशी निगडीत असलेल्या, वनविभागाने दाखल केलेल्या व त्यामध्ये आरोप असलेल्या कोणत्याही उपस्थित न्यायालयीन प्रकरणी खाजगी वकीलपत्र घेता येणार नाही.
7. वनविभागातर्फे दाखल करावयाचे परिच्छेद निहाय अभिप्राय/शपथपत्र प्रारुप हे कायदेशिरदृष्ट्या बरोबर आहे किंवा कसे, याबाबत संबंधित वनाधिकाऱ्याकडून संदर्भ प्राप्त झाल्यावर संबंधित वनाधिकाऱ्याने तयार केलेल्या प्रारुपाची छाणनी/तपासणी करुन आवश्यकतेनुसार त्यात सुधारणा करणे.
8. प्रलंबीत न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे तसेच न्यायालयीन प्रकरणांच्या अद्यावत स्थितीबाबत संबंधित वनाधिकाऱ्यांना वेळोवेळी लेखी अवगत करणे.
9. शासनाच्या विरोधात न्यायालयीन निकाल लागल्यास, अपील/पुनर्विलोकनाची प्रक्रिया वेळीच व्हावी, याबाबत दक्षता घेणे.
10. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.
11. करारनाम्याच्या कालावधीत विधी सल्लागार हा वनविभागाच्या विरोधात कोणतेही प्रकरण हाताळणार नाही.
12. सर्व न्यायालयीन प्रकरणांसाठी विभागीय स्तरावर नोडल ऑफीसर म्हणून काम पहाणे.
13. वन्यजीव शाखेतील मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, उपसंचालक, विभागीय वनअधिकारी यांची कार्यालये त्यांचे कार्यक्षेत्राशी निगडीत वनवृत्तापासून लांब आहेत. तथापि या वनवृत्तांर्गत असल्याने त्यांना विधी सल्लागाराची सेवा द्यावयाची आहे. त्यासाठी विधी सल्लागारांना कोणतेही अतिरिक्त शुल्क/भत्ता देय राहणार नाही.
14. उमेदवार वनविभागाच्या आस्थापना विषयक बाबी, न्यायालयीन प्रकरणाविषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादी बाबत ज्ञानसंपन्न असावा. ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.
15. वनविभागाच्या सर्व न्यायालयीन प्रकरणी पुर्ण वेळ देणे बंधनकारक राहील.
16. उमेदवाराचे मुख्यालय नागपूर येथे राहील.

**3) नियुक्तीचा कालावधी** :-

1. प्रथम टप्प्यात देण्यात येणारी नियुक्ती 11 महिण्यांकरीता राहील. परंतू करार पध्दतीने नियुक्ती केलेल्या अधिकाऱ्याचे काम समाधानकारक आढळल्यास पुढील कालावधीकरीता अटी व शर्ती न बदलता नियुक्ती कालावधी वाढविण्यात येईल. हा कालावधी 3 वर्षापेक्षा जास्त नसेल. काम समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास नियुक्ती कालावधी कमी देखील करण्यात येईल.

2. ही सरकारी नोकरी नाही. कंत्राटी पध्दतीवर ठरावीक कालावधीकरीता वनविभागाचे न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी नियुक्ती आहे.

**4) इतर अटी व शर्ती :-**

1. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशाने/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.
2. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्याच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
3. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती सोपवलेली सेवा पार पाडण्याचे कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.
4. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.
5. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली व्यक्तीनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांचे कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी आढावा घेवून कामाचे मुल्यमापन करतील.
6. संगणकाचे ज्ञान असलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल.
7. प्राप्त झालेले अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचे तसेच सदर प्रक्रिया थांबविण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे.
8. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13,दि.17.12.2016 सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे वेतन परिगणित करण्यात येईल.
9. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती वयाच्या 65 व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.
10. अर्जदाराने स्वहस्ताक्षरात लिहलेला/टंकलिखीत अर्ज (संपूर्ण माहिती असलेला जसे पूर्ण नांव, जन्मतारीख, पत्ता, शिक्षण, अनुभव, काम केलेल्या विभागाचे नाव इत्यादी) दिनांक 17/11/2025 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत कार्यालयाचे पत्त्यावर पाठवावा.

**5) अर्जाचा नमुना :-**

अर्जाचा नमुना वनविभागाच्या www.mahaforest.gov.in या वेबसाईटवर Nagpur Circle office/news & event या वेबपेजवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर नमुना डाऊनलोड करुन त्यातील नमुद बाबी व इतर बाबीसह सविस्तर तपशिलासह उमेदवाराने अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रासह प्रत्यक्ष किंवा खालील पत्त्यावर दि.17/11/2025 पर्यंत सादर करता येईल.

**अर्ज करावयाचा पत्ता :-**

वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त, नागपूर,

नवीन प्रशासकीय इमारत, शासकीय मुद्रणालयाजवळ, झिरो माईल, नागपूर-440 001

दुरध्वनी क्रमांक - 0712-2564 569

**6) अर्जदारासाठी इतर आवश्यक सुचना :-**

1. ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते लिफाफ्यावर स्पष्ट नमुद करावे.
2. निवड प्रक्रियेत अयशस्वी ठरलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांचे बाबतीत कोणताही प्रकारचा पत्र व्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सुचना दिली जाणार नाही.
3. अर्जासोबत कोणतीही फी अथवा आकारणी करण्यात आलेली नाही.

7) **निवड करावयाची पध्दत :-**

1. प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची व अर्जातील माहितीची छाणनी करुन निवड समितीने निवड केलेल्या उमेदवाराची नामिकासूची (Empanelment) तयार करण्यात येईल. नामिकासूची मधील उमेदवारांपैकी एकावेळी फक्त एकाच सेवानिवृत्त अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाईल.
2. निवडीबाबत कोणत्याही प्रकारचा स्वतंत्रपणे पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. आवश्यक सुचना वेबसाईटवर जाहीर करण्यात येईल.

**(श्रीलक्ष्मी.ए)**
वनसंरक्षक (प्रादे.)
नागपूर वनवृत्त, नागपूर

# अर्जाचा नमुना

## वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचे कार्यालय

**नागपूर वनवृत्तांतर्गत शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी विधी सल्लागारर पदावर घेणेबाबत.**

पासपोर्ट आकाराचे फोटो

1. अर्जदाराचे नांव (मराठी) :-
2. अर्जदाराचे नांव (इंग्रजी) (In capitals) :-
3. संपर्कासाठी मोबाईल क्रमांक :-
4. पत्ता :-
5. जन्मतारीख :-
6. शैक्षणिक अर्हता
   अ) कायदेविषयक अर्हता :-
   ब) सनद क्रमांक व दिनांक :-
   क) सनद जारी करणारे प्राधिकरण :-
7. अनुभव
   अ) सेवानिवृत्त अधिकारी यांचे सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद :-
   ब) एकूण सेवाचा कालावधी (वर्ष) :-
   क) सेवानिवृत्तीचा दिनांक :-
   ड) सेवा कालावधीत कार्यरत असलेल्या पदांचा तपशिल :-

| अ.क्र. | पदनाम | सेवा कालावधी (पासून - पर्यंत |
|---|---|---|
| 1. | | |
| 2. | | |
| 3. | | |
| 4. | | |
| 5. | | |
| 6. | | |

| | | |
|---|---|---|
| 7. | | |

8. वन व वन्यजीव कायद्यांतर्गत हातळलेल्या 5 महत्वाचे प्रकरणांचा तपशिल :-

| अ.क्र. | प्रकरण | प्रकरणाचा थोडक्यात तपशिल |
|---|---|---|
| 1. | | |
| 2. | | |
| 3. | | |
| 4. | | |
| 5. | | |

9. इतर पुरवणी माहिती :-

## प्रमाणपत्र

मी याव्दारे प्रमाणित करतो/करते की, या अर्जामध्ये नमुद केलेली माझी माहिती ही पुर्णपणे खरी आहे. माहिती चुकीची अथवा खोटी आढळल्यास नेमणूकीचे प्रक्रियेमधुन वगळण्यास पात्र राहीन. आपण प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत नमुद केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्तीचे वाचन केले असून ते मला पुर्णपणे मान्य आहेत.

दिनांक :

स्थळ : स्वाक्षरी

नांव

-oo-